# महाराष्ट्र शासन
# कृषि विभाग
# जवस पिकातील एकात्मिक पिक व्यवस्थापन

जवस हे रब्बी हंगामातील कमी खर्चाचे महत्त्वाचे तेलबिया पिक आहे. त्याचा उपयोग तेल व धागा निर्मितीसाठी केला जातो. तसेच जवस तेलामध्ये ५८%, ओमेगा-३, मेदाम्ल आणि अ‍ॅटी ओक्सीडेंट आहेत. त्यामुळे ह्रदय रोगाला कारणीभुत असलेले विकार, रक्तदाब, कोलेस्ट्रॉल, ट्रायग्लिसराईड यांचे प्रमाण कमी होते. संधीवात सुसह्य होतो. मधुमेह आटोक्यात येतो. कर्करोग व इतर रोगांना प्रतिकार शक्ती निर्माण होते. म्हणुन या बहुगुणी जवसाचे दैनंदीन आहारात घेणे उपयोगी ठरते. या पिकास थंड हवामान उपयुक्त असुन हे पिक जिरायती आणी बागायती लागवडीस योग्य आहे.

| अ.क्र. | बाब | निविष्ठा / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १ | जमीन | ➢ मध्यम ते भारी ओलावा टिकवुन ठेवणारी जमीन निवडावी. |
| २ | पुर्व मशागत | ➢ हेक्टरी १० गाडया चांगले कुजलेले शेणखत टाकुन, वखराच्या दोन पाळया देऊन जमीन भुसभुशीत करावी. |
| ३ | पेरणीची वेळ | ➢ कोरडवाहु पिकाची पेरणी १५ ऑक्टोंबर ते ३१ ऑक्टोंबर पर्यंत व बागायती पिकाची पेरणी १ ते ७ नोव्हेंबर पर्यंत करावी. |
| ४ | बिजप्रक्रिया | ➢ पेरणी पुर्वी बियाण्यास थायरम ३ ग्रॅम किंवा कार्बेडेन्झीम २ ग्रॅम /किलोस चोळावे. त्यानंतर ३ तासांनी अ‍ॅझोटोबॅक्टर २० ग्रॅम पी.एस.बी. २० ग्रॅम /किलो बियाणे बिजप्रक्रिया करावी. |
| ५ | सुधारीत वाण | ➢ जवस पिकाच्या आधिक उत्पादनासाठी सुधारित वाणाची निवड करावी.<br>➢ एन एल – ९७ – परिपक्व होण्याचा कालावधी – ११५ ते १२० दिवस, उत्पादन हेक्टरी ६ ते १२ क्विंटल, तेलाचे प्रमाण – ४४ टक्के.<br>➢ पिकेव्ही एन एल २६० – परिपक्व होण्याचा कालावधी – १०५ ते ११४ दिवस, उत्पादन हेक्टरी कोरडवाहु ६ ते १२ क्विंटल ओलीताखाली ९ ते १८ क्विंटल, तेलाचे प्रमाण –३८ टक्के. |
| ६ | आंतरपिक | ➢ जवस + हरभरा (४:२), जवस + करडई (४:२), जवस + मोहरी (५:१),या प्रमाणात पेरणी करता येते. दोन रांगेमधील अंतर ३० से.मी. ठेवावे. |
| ७ | बियाणे मात्रा | ➢ २५ किलो / हेक्टरी |
| ८ | रासायनिक खत | ➢ कोरडवाहुसाठी – २५ किलो नत्र, २५ किलो स्फुरद, १५ किलो गंधक / हेक्टर<br>➢ ओलीतासाठी – ६० किलो नत्र, ३० स्फुरद, १५ किलो गंधक / हेक्टर |
| ९ | ओलित व्यवस्थापन | ➢ या पिकास दोन ओलीताची आवश्यकता आहे. पहिले ओलीत पिक फुलोरा अवस्थेत (४० ते ४५ दिवसांनी) असतांना व दुसरे बोंडे (६५ ते ७० दिवसांनी) धरतांना द्यावे. |
| १० | आंतर मशागत | ➢ पेरणी नंतर २५ ते ३० दिवसांनी पहीली डवरणी व गरजेनुसार एक निदंनी करणे आवश्यक आहे. |
| ११ | पिक काढणी | ➢ पिकाची पाने व घाटे (बोंडया) पिवळया पडल्यावर पिक काढणीस योग्य समजावे. पिकाची काढणी विळयाच्या सहाय्याने करावी. कापणी झाल्यानंतर ४ ते ५ दिवसांनी वाळवुन मळणी करावी व बी योग्य प्रकारे साठवुन ठेवावे. |

| | | |
|---|---|---|
| १२ | उत्पादन | ➢ कोरडवाहु – ६ ते १२ क्विंटल/ हेक्टरी<br>➢ बागायती – ९ ते १८ क्विंटल/हेक्टरी |
| **किड व रोग** | | **एकात्मीक व्यवस्थापन** |
| गादमाशी | | ही किड नियंत्राणाकरीता कळी अवस्थेपासुन अझाडिरॅक्टीन ३०० पी पी एम ५० मि.ली. किंवा ॲसीटामाप्राईड २० एस.पी. २ ग्रॅम किंवा इमिडाक्लोरोप्रीड १७.८ एस.एल. २.५ मिली/ १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी |
| अल्टरजेरीया ब्लाईट (करपा) | | कार्बेनडीझंम किंवा मॅकोझेब २५ ग्रॅम / १० लिटर पाणी |
| भुरी | | नियंत्राणकरीता गंधक २५ ग्रॅम / १० लिटर पाणी |
| मर | | रोग नियंत्रणाकरीता बिजप्रक्रिया थायरम ३ ग्रॅम/ किलो किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व्हिरीडी बियाण्यास चोळावे. |








**प्रकल्प संचालक, आत्मा तथा**
**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम**
**(नविन प्रशासकिय ईमारत, दुसरा मजला रुम नं. २०९, २१०, २११, २१२)**
**फोन नं. ०७२५२-२३५८१३, ई मेल –dsaowashim@gmail.com**